# ध्यासपंथावरील दीपस्तंभ

शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर



# ध्यासपंथावरील दीपस्तंभ

१. जेन गुडाल
२. वांगारी माथाई
३. ऑंग सान स्यू ची
४. शिरीन इबादी
५. केमाल आतातुर्क
६. हो चि मिन्ह
७. नेल्सन मंडेला
८. मार्टिन ल्यूथर किंग (ज्यु.)
९. जयप्रकाश नारायण
१०. बाबा आमटे
११. सुंदरलाल बहुगुणा
१२. शरद जोशी
१३. डॉ. गोविंदाप्पा वेंकटस्वामी
१४. इला भट्ट
१५. डॉ. बिंदेश्वर पाठक
१६. अंशू गुप्ता

१९२० पासून आजपर्यंत ध्यासपंथावर अथकपणे वाटचाल करणाऱ्या अत्यंत प्रेरणादायी अशा सोळा व्यक्तींचा परिचय या पुस्तकात उलगडला आहे.

सोळापैकी आठजण परदेशी तर आठ भारतीय व्यक्ती आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांचा वेळोवेळी सन्मान करण्यात आला आहे.

अन्न–वस्त्र–निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा, तर स्वातंत्र्य–समता–आर्थिक, सामाजिक न्याय ही मनाची भूक! या सर्व गोष्टी सर्वांनाच, सगळीकडे सहजगत्या मिळतात असं नाही. त्यासाठी निसर्गातील, देशातील, समाजातील, पर्यावरणातील समतोल राखणे हा शाश्वत विकासाचा मार्ग!

देशापुढील तत्कालीन ज्वलंत समस्या सोडवण्यासाठी उभ्या राहणाऱ्या असामान्य नेत्यांची जडणघडण कशी होते याची ओळख तुम्हाला काही लेखांमधून होईल, तर अगदी मूलभूत अशा समस्यांचा विचार केल्यावर असामान्य अशी विधायक कार्ये उभी करणारे सामाजिक कार्यकर्तेही या पुस्तकातून तुम्हाला भेटतील. काम कोणतंही असो, त्याच्या पूर्ततेकडे होणारा या असामान्य व्यक्तींचा प्रवास खूपच मार्गदर्शक आहे.

या सर्व धगधगत्या ज्योतींपासून स्वत:चीही पणती लावून ती पेटती ठेवायचा संकल्प वाचकांनी करावा, हा या पुस्तकामागील हेतू आहे!

जडणघडणविषयक
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ १४०/–
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# ध्यासपंथावरील दीपस्तंभ

लेखिका
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

♦ **‘ध्यासपंथावरील दीपस्तंभ’**
(प्रेरणादायी अशा १६ व्यक्तिमत्त्वांचा परिचय,
त्यातील ६ लेख ‘छात्र प्रबोधन’मध्ये पूर्वप्रकाशित.)

♦ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, ‘‘छात्र प्रबोधन’,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
**email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org**

♦ **लेखिका**
➢ शैलजा देशमुख
सी - १०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे - ०९
मोबाइल - ९४२२६७१५६९, **email - sgdeshmukh50@gmail.com**

➢ नीलिमा करमरकर,
ब - शशिकिरण, अशोक पथ, विधी विद्यालय रस्ता, पुणे - ४
मोबाइल -९८२२०८२८९५, email - neelimakishor51@gmail.com

♦ © स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

♦ **अक्षरजुळणी, सजावट व मांडणी**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

♦ **मुखपृष्ठ**
निलेश जाधव

♦ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**

♦ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर भाद्रपद, शके १९४५/सप्टेंबर २०२३

♦ **किंमत :** ₹ १४०/-

**'Dhyasapanthavaril Deepsthambha'**
(Profiles of 16 Inspirational Personalities)

# प्रस्तावना

'ध्यासपंथावरील दीपस्तंभ' या पुस्तकात अत्यंत प्रेरणादायी अशा सोळा व्यक्तिमत्त्वांचा परिचय वाचकांसमोर प्रा. शैलजाताई देशमुख व प्रा. नीलिमाताई करमरकर यांनी उलगडून दाखविला आहे. यातील प्रत्येकच व्यक्तिमत्त्व उत्तुंग आहे आणि प्रत्येकाच्याच कार्यकर्तृत्वावर स्वतंत्रपणे पुस्तके लिहिली गेली आहेत, अजूनही त्यातील अनेकांबद्दल नव्याने लिहिले जात आहे. १९२० पासून आजपर्यंत २०२२ मध्येही या ध्यासपंथावर अथकपणे वाटचाल करणाऱ्या वारकऱ्यांचे हे सर्व अनुभव स्फूर्तिदायक आहेत. सोळांपैकी ८ व्यक्तिमत्त्वे परदेशातील आहेत. यातील काही व्यक्ती नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेल्या आहेत. उपेक्षितांचे जिणे सुसह्य व्हावे म्हणून प्रसंगी वर्षानुवर्षे तुरुंगवास सहन करून दडपशाहीसमोर न झुकणारी व्यक्तिमत्त्वे या पुस्तकात आहेत. 'स्वच्छता हाच परमेश्वर' ही भावना ठेवून आयुष्य समर्पण करणारे कार्यकर्ते आहेत, शेतकऱ्यांवरील अन्यायाला आर्थिक अभ्यासाचा भरभक्कम आधार असलेली मांडणी करणारे 'योद्धा शेतकरी' आहेत, तर पर्यावरणरक्षण हाच आयुष्याचा ध्यास घेतलेले भारतातील व परदेशातील सामाजिक कार्यकर्ते आहेत.

वर्णभेद-वंशभेदाचा लढा परदेशात चालविणारे मार्टिन ल्यूथर किंग किंवा नेल्सन मंडेला असोत, सैनिकी दडपशाहीविरुद्ध शांततापूर्ण व अहिंसक मार्गाने अजूनही लढा देणाऱ्या म्यानमारमधील आँग सान स्यू ची असोत किंवा रोजगार व आत्मसन्मानासाठी महिलांना संघटित करणाऱ्या गुजरातमधील इलाबेन भट्ट असोत- या सर्वच चालत्या-बोलत्या धगधगणाऱ्या ज्योतींपासून प्रत्येकाने स्वत:ची पणती लावून, ती पेटती ठेवायचा संकल्प हजारो वाचकांनी करावा, हा या पुस्तकनिर्मितीमागचा ज्ञान प्रबोधिनीचा उद्देश आहे. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी देशभरात नवनिर्माणाच्या व राष्ट्रबांधणीच्या प्रयत्नांचे स्फुल्लिंग पुन्हा प्रज्वलित व्हावे, ही इच्छा आहे. २०२२ मधील लढा हा कोणा इंग्रजाविरुद्ध नाही तर तो आपल्याच समोर असणाऱ्या अक्राळविक्राळ प्रश्नांना सामोरं जाण्याचा आहे. हे 'शत्रू' अज्ञान, दारिद्र्य, वाढणारी विषमता, असहिष्णुता, व्यक्तिकेंद्रित आत्मसंतुष्ट नागरिकांची पिढी, शहरीपणामुळे आलेली अस्वच्छता व बकालपणा; या व अशा अनेक आव्हानरूपी आहे. 'ध्यासपंथाचे दीपस्तंभ' या पुस्तकातील सर्वच स्त्री-पुरुषांची चरित्रे यासाठी आवर्जून वाचली पाहिजेत, अशी आहेत.

**स्वप्नांचा ध्यास–कष्टांची जोड :** या प्रत्येकाने आयुष्यात घेतलेला स्वप्नांचा ध्यास हा अक्षरश: स्वप्नवत आहे; पण त्यामागे अपार कष्ट आहेत, त्याग आहे. सुखासीन चैनी आयुष्याकडे ठरवून पाठ फिरवून कोणी आफ्रिकेच्या जंगलात जाण्याचा निर्णय घेतला आहे. स्वित्झर्लंडमधील पगाराकडे पाठ फिरवून कांद्याच्या शेतकऱ्यांसाठी आंदोलन करण्याचा निर्धार असो किंवा २०–२५ वर्षे तुरुंगवासात जाण्याची तयारी ठेवून लोकांच्या चळवळी उभारण्यासाठी स्वत:ला पणाला लावणे असो किंवा रस्त्यावर असहाय स्थितीत पडलेल्या एका कुष्ठरोग्याकडे पाहून आयुष्य त्यांच्या सेवेत झोकून देण्याचा निर्णय असो– हे सर्व विचारपूर्वक, 'भान ठेवून घेतलेले निर्णय' व त्यांची 'बेभान होऊन केलेली अंमलबजावणी' असो; सुरक्षित, चाकोरीबद्ध Comfort Zone च्या बाहेर येण्याच्या अशा निर्णयातूनच या सर्वांचे त्यागमय आयुष्य बहरलेले आहे. यातील अनेक व्यक्तिमत्त्वे आज आपल्यात नाहीतही. माझ्या सुदैवाने या पुस्तकात वर्णन केलेल्या काही व्यक्तिमत्त्वांना भेटण्याचा सुंदर अनुभव मला मिळाला. शेतकरी संघटनेचे दिवंगत नेते शरद जोशी, आनंदवनाचे दिवंगत बाबा आमटे, 'सेवा'च्या इलाबेन भट्ट व 'गूंज'चे अंशू गुप्ता. दक्षिण आफ्रिकेत प्रवास करताना नेल्सन मंडेला यांचे ज्येष्ठ सहकारीही भेटले व त्यांना ज्या तुरुंगात २५ वर्षे स्थानबद्ध केले होते, तो तुरुंगही पाहिला. हे सर्वच अनुभव मला संपन्न करणारे होते.

**आपण त्यांच्या समान व्हावे.. :** ज्ञान प्रबोधिनीत म्हटल्या जाणाऱ्या एका पद्यातील दोन ओळी या चरित्रांचे वाचन करताना स्मरणात येतात –

**'थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा**
**आपण त्यांच्या समान व्हावे, हाचि सापडे बोध खरा!'**

या पुस्तकातील सोळा व्यक्तींचा परिचय करून घेत असताना सर्वच वाचकांच्या मनात आपल्या समाजबांधवांबद्दल सह–अनुभूती (empathy) निर्माण व्हावी; जे–जे अन्याय, अभाव, दारिद्र्याने मागे पडले आहेत त्यांच्याबरोबर उभे राहून वाटचाल करावी; विषमता, अन्याय, हिंसा यांविरुद्ध चळवळी, आंदोलने, जनजागृती अशा अनेक अहिंसात्मक मार्गांनी सत्याग्रह करावा व 'जें का रंजलें गांजलें, त्यासि म्हणे जो आपुलें' या भावाने साधुत्वाकडे सर्वांचा प्रवास व्हावा, हाच शुभसंकल्प स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी आपण सर्वांनी करावा, तशी प्रेरणा अनेकांमध्ये जागृत व्हावी, ही प्रार्थना.

**दिनांक – १५ ऑगस्ट २०२३** **– अजित कानिटकर**

# अनुक्रमणिका


१. अरण्यवासी मी आनंदयात्री – **जेन गुडाल** ................................७

२. केनियातील पर्यावरणवादी नेत्या – **वांगारी माथाई** ....................१६

३. लोकशाही लढ्याचे नेतृत्व – **आँग सान स्यू ची** ......................२२

४. अजून चालतेची वाट...  – **शिरीन इबादी** ..........................३१

५. प्रगतिशील राष्ट्राचे स्वप्न साकारणारा राष्ट्राध्यक्ष– **केमाल आतातुर्क**....३७

६. अखंड व्हिएतनामचा राष्ट्रपिता – **हो चि मिन्ह** ........................४२

७. वंशभेदाविरुद्ध लढा देणारा नेता – **नेल्सन मंडेला** ....................४७

८. वर्णभेदाचा प्रतिकार करणारा झुंजार नेता – **मार्टिन ल्यूथर किंग** (ज्यु.) .... ५३

९. **लोकनायक – जयप्रकाश नारायण** ................................५९

१०. समाजसेवेचा आदर्श दीपस्तंभ – **बाबा आमटे** ......................६५

११. निसर्गऋषी – **सुंदरलाल बहुगुणा** ..................................७१

१२. शेतकरी आंदोलनाचे प्रणेते – **शरद जोशी** ..........................७७

१३. दुर्दम्य आशावादी – **डॉ. गोविंदाप्पा वेंकटस्वामी** ..................८७

१४. ‘सेवा’व्रती – **इला भट्ट** ..............................................९३

१५. स्वच्छ भारत अभियानाचा ध्यास – **डॉ. बिंदेश्वर पाठक**...........९९

१६. मायेचे वस्त्र पुरवणारा संवेदनशील कार्यकर्ता – **अंशू गुप्ता**......... १०५